## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३४०२/२०२२

**अपिलार्थी, श्री.सत्यजित बर्मन**
ऐंजल कॉम्पुटर, विजय शॉपिंग कॉम्पलेक्स
शॉप नं.८, कॅनरा बँक, अंबरनाथ पूर्व
जि.ठाणे ४२१ ५०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर
महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर
महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०७.०५.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २९.०८.२०२२ | --- | ०७.१०.२०२२ | --- |

अपिलार्थी यांनी दि. २२.११.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" No reply received nor any information was provided under RTI ACT २००५ "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०७.०५.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.संदिप जाधव, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" Provide information of complaint filed against UMC PWD department officers & Contractor dated ०२.०.२०२२.*

*१) Action taken report on complaint filed on ०२.०८.२०२२.*
*२) Copy of Inward & Outward number of register.*
*३) Details of letter correspondence with other office, Departments.*
*४) Copy of letter having remark by UMC Commissioner Shri.Aziz Shaikh.*
*५) Provide each & every documents related to this complaint.*
*६) Copy of UMC reply forwarded to complainant."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीच माहिती प्राप्त झालेली नाही. माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी वारंवार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास भेट दिली. तथापि त्यानंतर सुध्दा जन माहिती अधिकारी यांचे तर्फे त्यांना कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुध्दा याप्रकरणात सुनावणी घेतली नाही किंवा कोणतेही आदेश पारित केले नाहीत.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.३१.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविली होती. तथापि त्यांचे पत्त्यामधे बदल झाला असल्यामुळे, सदरचे पत्र परत आले आहे. आता त्यांचा योग्य पत्ता प्राप्त झाला असल्यामुळे दि.०६.०५.२०२५ रोजी माहिती नवीन पत्त्यावर पाठविली आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती पाठविली नाही. ज्या पत्राद्वारे माहिती पाठविल्याचा उल्लेख केला आहे. ते पत्र दि.३०.१२.२०२४ रोजी पाठविण्यात आले होते. म्हणजेच विहित मुदतीमध्ये अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नव्हती हे स्पष्ट होते. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश निर्गमित करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक ढोले, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २९.०८.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.प्रशांत सोळंके, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी अपीलार्थी यांनी दिनांक ०७.१०.२०२२ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.११.०६.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०७ मे, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.प्रशांत सोळंके, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.व

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

-यांना प्रत
विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.संदिप जाधव,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३. **यांचे मार्फत प्रत रवाना.**

## सुनावणी दिनांक ११.०६.२०२५ ( In Continuation of order dt.०७.०५.२०२५)

## विवेचन

उपरोक्त दि.०७.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ११.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.प्रशांत सोळंके, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा (सेवानिवृत्त), उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी आयोगाच्या दि.०७.०५.२०२५ रोजीच्या आदेशानुसार माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबातचा खुलासा सादर केला आहे. सदर खुलाश्यात त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना संबंधीत एजन्सीने काम सुरु असताना कामाचे बांधकाम साहित्य रस्त्यावर इतरत्र टाकल्याने एजन्सीला अपिलार्थी यांचे दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजीचे अर्जापूर्वीच संबंधित ठेकेदारास या विभागामार्फत नोटीस बजावण्या आली होती. ही माहिती अपिलार्थी यांना नि:शुल्क प्रत त्यांच्या पत्रामध्ये दिलेल्या पत्त्यावर दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आली होती. मुळात माहिती दि.३१.१२.२०२४ रोजी दिल्याचे दि.०७.०५.२०२५ रोजीच्या आदेशात नमूद केले आहेच, परंतु ती इतक्या विलंबाने का दिली याबाबतचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांना करणेबाबत आदेशीत केले होते. मात्र त्यांनी दिलेल्या खुलाश्यामध्ये या विलंबाबात त्यांनी काहीही नमूद केले नाही. म्हणजेच या विलंबासाठी सादर करण्याकरिता त्यांचेकडे कोणताही समाधानकारक खुलासा नाही असे स्पष्ट होते.

तसेच आयोगाने दि.०७.०५.२०२५ रोजीच्या आदेशामध्ये असेही निर्देश दिले होते की, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक ढोले, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती १५ दिवसात नि:शुल्क पुरवावी. तथापि अद्यापपर्यंत अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यात आल्याचे दिसून येत नाही. आयोगाच्या आदेशानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री.दिपक ढोले, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.प्रशांत उत्तमराव सोळंके, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी आयोगाच्या आदेशाप्रमाणे दि.११.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा लेखी खुलासा सादर केला आहे. सदर खुलाश्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, अपिलार्थी यांनी दि.०७.१०.२०२२ रोजी उत्तरवादी यांचे कार्यालयात प्रथम अपिल सादर केले. सदरचे अपील दि.२८.१०.२०२२ रोजी उत्तरवादी यांचे समक्ष आल्यानंतर उत्तरवादी यांनी अपिलार्थी यांना दि.२९.११.२०२२ रोजी दुपरी १२.००, १२.२०, १२४०, ०१.००, ०१.२०, ०१.२५ या वेळा देवून सुनावणीस हजर राहण्याबाबत पत्र पाठविण्यात आले. परंतु अपिलार्थी

सुनावणीस व्यक्तीश: हजर झाले नाहीत, तसेच सुनावणीस अनुपस्थित राहत असल्यबाबत त्यांचेद्वारा कळविण्यात आले नाही. त्यामुळे उत्तरवादी यांनी सकारात्मक विचार करुन अपिलार्थी यांना सुनावणीची संधी मिळावी म्हणून दि.०२.१२.२०२२ रोजी पुन:श्च सुनावणी नोटीस काढून दि.१४.१२.२०२२ रोजी सुनावणीस हजर राहण्याबाबतचे पत्र दिले. सदर सुनावणीस सुध्दा अपिलार्थी हजर राहिले नाहीत व त्याबाबत कुठलेही कारण त्यांनी कळविले नाही. त्यामुळे उत्तरवादी यांनी माहिती अधिकार कायद्याच्या तरतूदीनुसार २ वेळा सुनावणीची संधी देऊन सुध्दा अपिलार्थी गैरहजर राहिले. त्यानंतर उत्तरवादी यांचे स्थलांतर झाले असल्याने, आदेशानंतर झालेल्या प्रक्रियेबाबत ते अनभिज्ञ आहेत.

वरिल विवेचनाचे आधारे आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा (सेवा निवृत्त), उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.२५,०००/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे मासिक निवृत्ती वेतनातून १० समान हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षा खाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी आयोगास सादर करावा.

२. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक ढोले, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २९.०८.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.प्रशांत उत्तमराव सोळंके, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक असून, त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यांचेवरील सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार प्रस्तावित शिस्तभंगाविषयक कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ जून, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

२. उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर, मुख्यालय, पहिला मजला, उल्हासनगर ४२१ ००३.

४. आहरण व संवितरण अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर, मुख्यालय, पहिला मजला, उल्हासनगर ४२१ ००३.

५. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा (सेवा निवृत्त), उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर. व
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक ढोले, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.
-यांना प्रत
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुयश बांगर,
उप अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.
यांचे मार्फत प्रत रवाना.